नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/१०/२०२६ (शनिवार )

---

## २० किलो गांजा सह २ चारचाकी वाहन असा एकुण १७ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त, अवैधरित्या गांजा वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपीतांना अटक,

## नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तसेच श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग आणि श्री शशांत एम एम,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री भारत लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्यासह मौदा पोलीसांनी दिनांक १०/१०/२०२६ रोजी अवैध गांजा वाहतुक करणारे तसेच खरेदी करणारे यांच्या टोळीतील ०४ आरोपींना अटक करून २०.०४८ किलोग्रॅम गांजा जप्त केला.**

दिनांक १०/१०/२०२६ रोजी मौदा पोलीसांना रात्र गस्त दरम्यान खात्रीशिर गोपनिय माहीती प्राप्त झाली की, छत्तीसगढ कडुन नागपुर कडे बलेनो कार मध्ये अवैधरित्या गांजा ची वाहतुक केली जात आहे. मौदा पोलीसांना अशी माहीती प्राप्त होताच तात्काळ वरीष्ठ अधिकारी आणि जिल्हा गस्त अधिकारी श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांना माहीती दिली. मौदा पोलीसांनी महादुला फाटा, बोरगाव येथे नाकाबंदी केली. सदर नाकाबंदी दरम्यान पोलीसांना बलेनो कार क्रं सी जी ०४ पी एक्स ६२८३ वाहनावर BUREAU CHIEF MAHASAMUND F-BHARAT 24 NEWS असे लिहलेले संशयीत वाहन मिळुन आले. वाहनात चालक **आरोपी क्र १. धनुर्जय विजय परमार, वय ३४ वर्षे आणि क्र.२. सौकीलाल प्रेमलाल बंजारा, वय ४० वर्षे, दोन्ही रा. रेमडा, पोस्ट सालेतलाई, ता. पिथोडा, जि.**

**महासमुर्ग, राज्य छत्तीसगड** हे मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष सदर वाहनाची झडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला तसेच व्हिडिओ रेकॉर्डिंग कॅमेरा, माइक व प्रेस कार्ड असे साहीत्य मिळुन आले.आरोपींना गांजा बाबत अधिक विचारपुस केली असता सदर गांजा घेण्यास आरोपी शुभम दामोदर बडे हा येणार आहे अशी माहीती दिली. मौदा पोलीसांनी तात्काळ सदर माहीतच्या अनुषंगाने कारवाई करत सदर आरोपीला पकडण्यासाठी सापळा रचला. मौदा पोलीसांनी शिताफिने यातील **आरोपी क्रं ३. शुभम दामोदर बडे, वय ३१ वर्षे, रा. नारायणगाव परिसर, ता. जुन्नर, जि. पुणे. आणि ४. दामोदर लक्ष्मण बडे, वय ६५ वर्षे, रा. नारायणगाव परिसर, ता. जुन्नर, जि. पुणे** यांना मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार, क्रमांक एम एच ०२/बीजे २६८५ सह माथनी टोलनाका येथे ताब्यात घेतले.

**पोलीसांनी पंचासमक्ष महादुला फाटा, बोरगाव येथुन आरोपीच्या ताब्यातुन २०.०४८ किलोग्रॅम अंमली पदार्थ गांजा किंमती ५,००,०००/—रुपये , बलेनो कार क्रं सी जी ०४ पी एक्स ६२८३ किंमती ६,००,०००/—रुपये ,दोन मोबाईल, F-BHARAT 24 NEWS मीडिया व्हिडिओ रेकॉर्डिंग कॅमेरा आणि माईक आणि इतर साहीत्य असा एकुण १२,१४,१००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला तसेच माथनी टोलनाका येथुन मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार, क्रमांक एम एच ०२/बीजे २६८५ किंमती ५,००,०००/— रूपये ,दोन अँड्रॉइड मोबाईल, एक किपॅड मोबाईल असा ५,२०,०००/—.रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही कारवाईत एकुण १७,३४,१००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ८(क), २० (ब), (ii),(क),२२,२९ एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे.**


ORBIT
WIRES & CABLES
पोलीस ठाणे मौदा
जि. नागपुर ( ग्रा.)
ऑर्बिट
वायर एण्ड केबल

# जानेवारी ते सप्टेंबर २०२६ मध्ये रस्ते अपघातांमध्ये तसेच अपघातातील मृत्युच्या संख्येत घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये महाराष्ट्र राज्यात नागपूर ग्रामीण जिल्हयाला चौथे स्थान प्राप्त

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ (जानेवारी ते सप्टेंबर ) मध्ये सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे. सन २०२६ (जानेवारी ते सप्टेबर) या कालावधीत सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातांमध्ये १३ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २० टक्क्यांनी घट झाली आहे तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट तसेच अपघातातील मृत्युच्या संख्येत घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने चौथे स्थान प्राप्त केले आहे. सन २०२६ (जानेवारी ते सप्टेंबर ) या कालावधीत महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मध्ये नागपुर ग्रामीणला सातत्याने पहील्या पाच मध्ये स्थान प्राप्त झाले आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच जुलै २०२६ पासून **Dynamic Enforcement Action Plan** हा अभिनव उपक्रम **SaveLIFE Foundation** यांच्या तांत्रिक सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला आहे.

सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार , वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक आणि माहितीवर आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. अपघातप्रवण ठिकाणांचे विश्लेषण, प्रभावी वाहतूक नियंत्रण, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती अशा उपाययोजनांद्वारे अपघातांचे प्रमाण कमी करण्यावर भर देण्यात येत आहे.

नागपूर ग्रामीण पोलीसांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी मिळत असून, नागरिकांचे प्राण वाचविणे आणि रस्ते अपघातांमुळे होणारी जीवितहानी कमी करणे या उद्दिष्टांच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती साध्य होत आहे.

# MAHARASHTRA STATE

## Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO SEP 2025 | | | JAN TO SEP 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO SEP 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | MB-VV | 551 | 138 | 486 | 643 | 147 | 562 | 17 | 7 | 16 |
| 2 | Navi Mumbai | 590 | 212 | 523 | 681 | 205 | 639 | 15 | -3 | 22 |
| 3 | Thane City | 721 | 175 | 682 | 828 | 198 | 757 | 15 | 13 | 11 |
| 4 | Nasik City | 377 | 152 | 358 | 426 | 126 | 394 | 13 | -17 | 10 |
| 5 | Ratnagiri | 266 | 102 | 349 | 296 | 96 | 408 | 11 | -6 | 17 |
| 6 | C.S.Nagar City | 471 | 130 | 410 | 516 | 151 | 454 | 10 | 16 | 11 |
| 7 | PCPC | 950 | 306 | 848 | 1027 | 288 | 994 | 8 | -6 | 17 |
| 8 | Wardha | 266 | 133 | 278 | 287 | 136 | 226 | 8 | 2 | -19 |
| 9 | Palghar | 360 | 212 | 180 | 387 | 232 | 269 | 8 | 9 | 49 |
| 10 | Gadchiroli | 179 | 121 | 158 | 190 | 88 | 313 | 6 | -27 | 98 |
| 11 | Latur | 601 | 278 | 397 | 635 | 302 | 415 | 6 | 9 | 5 |
| 12 | C.S.Nagar R | 630 | 416 | 341 | 665 | 396 | 477 | 6 | -5 | 40 |
| 13 | Pune City | 1023 | 222 | 754 | 1079 | 243 | 855 | 5 | 9 | 13 |
| 14 | Washim | 243 | 157 | 165 | 255 | 138 | 245 | 5 | -12 | 48 |
| 15 | Dhule | 541 | 290 | 576 | 565 | 312 | 613 | 4 | 8 | 6 |
| 16 | Raigad | 491 | 195 | 633 | 507 | 210 | 570 | 3 | 8 | -10 |
| 17 | Thane R | 315 | 188 | 271 | 325 | 186 | 296 | 3 | -1 | 9 |
| 18 | Mumbai City | 1903 | 269 | 1979 | 1955 | 262 | 2060 | 3 | -3 | 4 |
| 19 | Gondia | 255 | 134 | 172 | 260 | 154 | 189 | 2 | 15 | 10 |
| 20 | Nasik R | 1149 | 727 | 1488 | 1168 | 673 | 1564 | 2 | -7 | 5 |
| 21 | Akola | 347 | 144 | 309 | 352 | 111 | 299 | 1 | -23 | -3 |
| 22 | Pune R | 1470 | 768 | 1135 | 1491 | 726 | 1009 | 1 | -5 | -11 |
| 23 | Beed | 600 | 335 | 409 | 603 | 296 | 376 | 0 | -12 | -8 |
| 24 | Hingoli | 322 | 181 | 271 | 323 | 176 | 290 | 0 | -3 | 7 |
| 25 | Chandrapur | 567 | 266 | 459 | 568 | 242 | 505 | 0 | -9 | 10 |
| 26 | Parbhani | 381 | 183 | 307 | 381 | 193 | 292 | 0 | 5 | -5 |
| 27 | Jalna | 516 | 272 | 521 | 514 | 277 | 482 | 0 | 2 | -7 |
| 28 | Amravati City | 313 | 56 | 302 | 306 | 78 | 295 | -2 | 39 | -2 |
| 29 | Nanded | 681 | 370 | 406 | 665 | 372 | 356 | -2 | 1 | -12 |
| 30 | Solapur R | 908 | 530 | 978 | 874 | 517 | 894 | -4 | -2 | -9 |
| 31 | Satara | 734 | 374 | 542 | 704 | 355 | 519 | -4 | -5 | -4 |
| 32 | Sindhudurg | 145 | 64 | 229 | 137 | 60 | 165 | -6 | -6 | -28 |
| 33 | Sangli | 765 | 411 | 590 | 722 | 372 | 591 | -6 | -9 | 0 |
| 34 | Buldhana | 522 | 301 | 464 | 491 | 270 | 361 | -6 | -10 | -22 |
| 35 | Jalgaon | 681 | 349 | 592 | 638 | 364 | 463 | -6 | 4 | -22 |
| 36 | Nandurbar | 257 | 149 | 325 | 240 | 131 | 366 | -7 | -12 | 13 |
| 37 | Amravati R | 371 | 224 | 291 | 342 | 211 | 305 | -8 | -6 | 5 |
| 38 | Kolhapur | 822 | 292 | 751 | 756 | 301 | 684 | -8 | 3 | -9 |
| 39 | Bhandara | 294 | 133 | 288 | 269 | 111 | 291 | -9 | -17 | 1 |
| 40 | Nagpur City | 916 | 235 | 895 | 826 | 185 | 834 | -10 | -21 | -7 |
| 41 | Solapur City | 192 | 67 | 167 | 169 | 61 | 131 | -12 | -9 | -22 |
| 42 | Nagpur R | 731 | 340 | 761 | 638 | 271 | 747 | -13 | -20 | -2 |
| 43 | Ahilyanagar | 1573 | 698 | 1295 | 1303 | 594 | 994 | -17 | -15 | -23 |
| 44 | Dharashiv | 492 | 286 | 488 | 396 | 231 | 379 | -20 | -19 | -22 |
| 45 | Yavatmal | 685 | 327 | 433 | 512 | 278 | 327 | -25 | -15 | -24 |
| | TOTAL | 27167 | 11912 | 24256 | 26915 | 11326 | 24255 | -1 | -5 | 0 |

Page 1

# MAHARASHTRA STATE

## Total Killed Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO SEP 2025 | | | JAN TO SEP 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO SEP 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Amravati City | 313 | 56 | 302 | 306 | 78 | 295 | -2 | 39 | -2 |
| 2 | C.S.Nagar City | 471 | 130 | 410 | 516 | 151 | 454 | 10 | 16 | 11 |
| 3 | Gondia | 255 | 134 | 172 | 260 | 154 | 189 | 2 | 15 | 10 |
| 4 | Thane City | 721 | 175 | 682 | 828 | 198 | 757 | 15 | 13 | 11 |
| 5 | Pune City | 1023 | 222 | 754 | 1079 | 243 | 855 | 5 | 9 | 13 |
| 6 | Palghar | 360 | 212 | 180 | 387 | 232 | 269 | 8 | 9 | 49 |
| 7 | Latur | 601 | 278 | 397 | 635 | 302 | 415 | 6 | 9 | 5 |
| 8 | Raigad | 491 | 195 | 633 | 507 | 210 | 570 | 3 | 8 | -10 |
| 9 | Dhule | 541 | 290 | 576 | 565 | 312 | 613 | 4 | 8 | 6 |
| 10 | MB-VV | 551 | 138 | 486 | 643 | 147 | 562 | 17 | 7 | 16 |
| 11 | Parbhani | 381 | 183 | 307 | 381 | 193 | 292 | 0 | 5 | -5 |
| 12 | Jalgaon | 681 | 349 | 592 | 638 | 364 | 463 | -6 | 4 | -22 |
| 13 | Kolhapur | 822 | 292 | 751 | 756 | 301 | 684 | -8 | 3 | -9 |
| 14 | Wardha | 266 | 133 | 278 | 287 | 136 | 226 | 8 | 2 | -19 |
| 15 | Jalna | 516 | 272 | 521 | 514 | 277 | 482 | 0 | 2 | -7 |
| 16 | Nanded | 681 | 370 | 406 | 665 | 372 | 356 | -2 | 1 | -12 |
| 17 | Thane R | 315 | 188 | 271 | 325 | 186 | 296 | 3 | -1 | 9 |
| 18 | Solapur R | 908 | 530 | 978 | 874 | 517 | 894 | -4 | -2 | -9 |
| 19 | Mumbai City | 1903 | 269 | 1979 | 1955 | 262 | 2060 | 3 | -3 | 4 |
| 20 | Hingoli | 322 | 181 | 271 | 323 | 176 | 290 | 0 | -3 | 7 |
| 21 | Navi Mumbai | 590 | 212 | 523 | 681 | 205 | 639 | 15 | -3 | 22 |
| 22 | C.S.Nagar R | 630 | 416 | 341 | 665 | 396 | 477 | 6 | -5 | 40 |
| 23 | Satara | 734 | 374 | 542 | 704 | 355 | 519 | -4 | -5 | -4 |
| 24 | Pune R | 1470 | 768 | 1135 | 1491 | 726 | 1009 | 1 | -5 | -11 |
| 25 | Amravati R | 371 | 224 | 291 | 342 | 211 | 305 | -8 | -6 | 5 |
| 26 | Ratnagiri | 266 | 102 | 349 | 296 | 96 | 408 | 11 | -6 | 17 |
| 27 | PCPC | 950 | 306 | 848 | 1027 | 288 | 994 | 8 | -6 | 17 |
| 28 | Sindhudurg | 145 | 64 | 229 | 137 | 60 | 165 | -6 | -6 | -28 |
| 29 | Nasik R | 1149 | 727 | 1488 | 1168 | 673 | 1564 | 2 | -7 | 5 |
| 30 | Solapur City | 192 | 67 | 167 | 169 | 61 | 131 | -12 | -9 | -22 |
| 31 | Chandrapur | 567 | 266 | 459 | 568 | 242 | 505 | 0 | -9 | 10 |
| 32 | Sangli | 765 | 411 | 590 | 722 | 372 | 591 | -6 | -9 | 0 |
| 33 | Buldhana | 522 | 301 | 464 | 491 | 270 | 361 | -6 | -10 | -22 |
| 34 | Beed | 600 | 335 | 409 | 603 | 296 | 376 | 0 | -12 | -8 |
| 35 | Nandurbar | 257 | 149 | 325 | 240 | 131 | 366 | -7 | -12 | 13 |
| 36 | Washim | 243 | 157 | 165 | 255 | 138 | 245 | 5 | -12 | 48 |
| 37 | Ahilyanagar | 1573 | 698 | 1295 | 1303 | 594 | 994 | -17 | -15 | -23 |
| 38 | Yavatmal | 685 | 327 | 433 | 512 | 278 | 327 | -25 | -15 | -24 |
| 39 | Bhandara | 294 | 133 | 288 | 269 | 111 | 291 | -9 | -17 | 1 |
| 40 | Nasik City | 377 | 152 | 358 | 426 | 126 | 394 | 13 | -17 | 10 |
| 41 | Dharashiv | 492 | 286 | 488 | 396 | 231 | 379 | -20 | -19 | -22 |
| 42 | Nagpur R | 731 | 340 | 761 | 638 | 271 | 747 | -13 | -20 | -2 |
| 43 | Nagpur City | 916 | 235 | 895 | 826 | 185 | 834 | -10 | -21 | -7 |
| 44 | Akola | 347 | 144 | 309 | 352 | 111 | 299 | 1 | -23 | -3 |
| 45 | Gadchiroli | 179 | 121 | 158 | 190 | 88 | 313 | 6 | -27 | 98 |
| | TOTAL | 27167 | 11912 | 24256 | 26915 | 11326 | 24255 | -1 | -5 | 0 |

# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०७ गोवंश जनावरांची सुटका, भिवापूर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापूर :— दिनांक ०९/१०/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तहसिल टी पॉईंट येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान झायलो कार क्र. एम एच—१२/एफ के—२४८२ येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०७ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. मिळुन आलेल्या ०७ गोवंश जनावरांची सुटका करण्यात आली आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून झायलो कार क्र. एम एच—१२/एफ के—२४८२ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०७ गोवंश जनावरे किंमती ९०,०००/— रूपये असा एकुण किंमती ४,९०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी झायलो कार क्र. एम एच—१२/एफ के—२४८२ चा चालक व मालक याच्या विरूध्द कलम २८१, १२५ भां.न्या.सं. सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम ११(१), (ड) प्राण्यांचा छळ अधिनियम कायदयाअन्वये गुन्हा नोंद केला आहे.**




## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १०/१०/२०२६ रोजी आगामी नवरात्रोत्सव तसेच इतर सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात विविध पोलीस स्टेशन च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन उमरेड** :— श्री मयंक माधव सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग यांचे उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक प्रभारी अधिकारी,

पोलीस स्टेशन उमरेड यांच्यासह उमरेड पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी उमरेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री अजितसिंग देवरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर यांच्या उपस्थितीत भिवापूर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी भिवापूर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांच्यासह कुही पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी कुही शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन वेलतुर**:— पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांच्यासह वेलतुर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी वेलतुर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पाचगाव** :— पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्यासह पाचगाव पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी पाचगाव येथील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन काटोल** :— श्री पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्यासह काटोल पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक

(RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी काटोल शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— श्री पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांच्यासह नरखेड पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी नरखेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांच्यासह कोंढाळी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी कोंढाळी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्यासह जलालखेडा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी जलालखेडा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**


ॐ
श्री कृष्ण मंदिर




महाराष्ट्र पोलीस
दुरध्वनी क्र: 07112-222029










SUNNY JAGDISH PATEL
Civil Engineer | Contractor | License Planner
PiZaMania
SML


गिरनार
POLICE
दातांचा दवाखाना


कडू हॉस्पिटल
ज्ञानार्जन केंद्र
Dinshaw's



## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी नवरात्रोत्सवाच्या तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पाश्र्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

पोलीस स्टेशन रामटेक :— **दिनांक ०९/१०/२०२६ रोजी** आगामी नवरात्रोत्सवाच्या श्री प्रियांश महाजन उपविभागीय अधिकारी व श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी नवरात्रोत्सव सण उत्सवांच्या अनुषंगाने रामटेक पोलीस ठाणे हद्दीतील दुर्गादेवी मंडळांचे पदाधिकारी, गरबा व रावण दहनाचे आयोजक तसेच शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस तहसीलदार श्री. रमेश कोळपे, रामटेक नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती पल्लवी राऊत, पोलीस निरीक्षक श्री. राजेश कुमार

थोरात प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन रामटेक सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री. सौरभ तसेच महावितरणच्या रामटेक कार्यालयातील श्री. जावेद शेख यांच्यासह नवदुर्गा मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन अरोली** :— **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या उपस्थितीती आगामी नवरात्रोत्सव सण उत्सवांच्या अनुषंगाने अरोली पोलीस ठाणे हद्दीतील दुर्गादेवी मंडळांचे पदाधिकारी आणि शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस सहा पोलीस निरीक्षक श्री. सागर गोमासे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन अरोली यांच्या सह पोलीस स्टेशन अरोली अधिकारी अंमलदार उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— **दिनांक ०९/१०/२०२६ रोजी** सहा. पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी आगामी नवरात्रोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने दुर्गादेवी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— **दिनांक ०९/१०/२०२६ रोजी** सहा. पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी नवरात्रोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने दुर्गादेवी मंडळांचे पदाधिकारी व डीजे मालकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन मोहपा** :— **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांनी नवरात्रोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने दुर्गादेवी मंडळांचे पदाधिकारी यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी नवरात्रोत्सव अनुषंगाने गरबा उत्सवाचे आयोजकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांनी नवरात्रोत्सव अनुषंगाने शांतता समिती सदस्यांची बैठक घेतली.

**नवरात्रोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी तसेच उत्सव मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. दुर्गा**

उत्सवाच्या अनुषंगाने गावातील दुर्गा उत्सव मंडळांना नियमानुसार आवश्यक परवानगी घेणे, डीजे व ध्वनी प्रदूषणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.








ISHWAR S. HANWATE
Paradise




पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य
शाखा कुही






पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. बुटीबोरी
नागपूर ग्रामीण
अधिकारी कार्यकाळ तक्ता

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक ०९/१०/२०२६ रोजी खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन कुही :–** **पोलीस स्टेशन कुही** येथे पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र पाटील प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांनी मांढळ येथील लेमदेव पाटील महाविद्यालय येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन बोरी :–** **पोलीस स्टेशन बोरी** येथे सहायक पोलीस निरीक्षक श्री. जीवन लाकडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बोरी यांनी बोरी पोलीस ठाण्याच्या वतीने कर्मण्य स्कूल ऑफ एक्सलन्स, दत्त विद्यामंदिर, बुटीबोरी येथे भेट देवुन सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. विद्यार्थी व शिक्षकवृंद यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन सायबर जनजागृती केली.

**पोलीस स्टेशन नरखेड** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांनी गांधी चौक नरखेड येथे मा नव दुर्गा उत्सव मंडळ या ठिकाणी सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास मंडळाचे पदाधिकारी हे उपस्थित होते

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.**

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.








SHRI LEMDEO PATIL MAHAVIDYALAYA
Shri Lemdeo Patil Mahavidyalaya, Mandhal
National Service Scheme, Rotaract Club and
National Cadet Corps
Collaboration with




## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०८ गुन्हे दाखल,

**दिनांक ०९/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मोहपा** येथे आरोपी नामे दुर्वास रामकृष्ण लाहाबार, रा. सुसुद्रा, ता. कारंजा, जि. वर्धा ह.मु. कोहळी, ता. कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे संजय भगवानजी तागडे, वय ४१ वर्ष याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे नामदेव रामराव पाचोडी, वय ४२ वर्ष, तिनखेडा ता नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे देवाजी शंकर माहुले, वय ४९ वर्ष, रा. प्लॉट नं. ५१, चिटणवीस नगर मोठा ताजबाग उमरेड रोड जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद , **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे १) ओमेश्वर दिवाकर खंबाळकर, वय २९ वर्ष, रा. फेगड ता. कुही २) प्रकाश बंडु डहाके, वय ३४ वर्ष, रा. फेगड ता. कुही यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे जयपाल सोमाजी मुंगाटे, वय ४५ वर्ष, वार्ड क्र. ०३ आजनगाव ता. मौदा याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन**

**अरोली** येथे आरोपी नामे मुकेश मनोहर महाजन, वय ४५ वर्ष, रा. वरठी ता.मोहाडीयाचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९७२० मिली देशी दारू असा एकुण ४३२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०९ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १०/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०९ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १८ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे १६ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १७ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ अरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.





जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर